**ठळक बातम्या**

- राज्य विधिमंडळाचं हिवाळी अधिवेशन संस्थगित, अर्थसंकल्पीय अधिवेशन २३ फेब्रुवारीपासून मुंबईत

- रिझर्व्ह बँकेच्या मर्यादेतच राज्य सरकारनं कर्ज घेतलं असून राजकोषीय तूट तीन टक्क्याच्या आत असल्याचं मुख्यमंत्र्यांचं विधानसभेत प्रतिपादन

- भाजपाच्या राष्ट्रीय कार्यकारी अध्यक्षपदी नितीन नबीन यांची नियुक्ती

- एकोणीस वर्षांखालच्या आशिया चषक क्रिकेट स्पर्धेत भारताचा पाकिस्तानवर ९० धावांनी विजय

**आणि**

- लोकप्रिय फूटबॉलपटू लिओनेल मेस्सीच्या हस्ते मुंबईत प्रोजेक्ट महादेवचा प्रारंभ

**<><><><><>**

राज्य विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाचं आज सूप वाजलं. या अधिवेशनादरम्यान विधानसभेच्या ७ बैठकांमध्ये एकंदर ७२ तास ३५ मिनिटं काम झाल्याची माहिती विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी दिली. तर विधानपरिषदेच्या ७ बैठकांमध्ये ४८ तास १६ मिनिटं कामकाज झालं, असं विधानपरिषदेचे सभापती राम शिंदे यांनी सांगितलं. या कालावधीत विधानसभेत एकंदर १८ विधेयकं पुनर्स्थापित करण्यात आली आणि त्यातली १६ मंजूर झाली, तर विधानपरिषदेत ४ विधेयकं संमत झाली. विधिमंडळाचं अर्थसंकल्पीय अधिवेशन २३ फेब्रुवारी २०२६पासून मुंबईत होणार आहे.

**<><><><><>**

रिझर्व्ह बँकेने घालून दिलेल्या मर्यादेच्या आतच राज्य सरकारनं कर्ज घेतलं असून राजकोषीय तूट तीन टक्क्यांच्या आत ठेवण्यात यश आलं असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी म्हटलं आहे. विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात आज शेवटच्या दिवशी विधानसभेत अंतिम आठवडा प्रस्तावावरच्या चर्चेला त्यांनी उत्तर दिलं. चालू आर्थिक

वर्षातही राजकोषीय तूट तीन टक्क्याच्या आत ठेवण्यात यश येईल असा विश्वास व्यक्त करत, राज्य दिवाळखोरीकडे जात नसल्याचं त्यांनी स्पष्ट केलं.

**- - होल्ड बाईट मुख्यमंत्री- -**

२०२९-३० पर्यंत राज्याची अर्थव्यवस्था एक ट्रिलियन डॉलरपर्यंत जाईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. रचनात्मक कार्यातून राज्याचा विकास साधायचा आहे, यासाठी सत्ताधारी आणि विरोधक दोघांनी मिळून प्रयत्न करायला हवेत, अशी अपेक्षा मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केली.

इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठीच्या महाज्योती मार्फत स्पर्धा परीक्षांसाठी प्रशिक्षण योजना ऑनलाइन उपलब्ध होणार आहे, त्याऐवजी हे प्रशिक्षण ऑफलाईन द्यावं अशी मागणी काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी आज विधानसभेत केली. त्यावर, मागणी असेल तर प्रशिक्षण ऑफलाईनही दिलं जाईल, असं मंत्री अतुल सावे यांनी सांगितलं. विधानपरिषदेत उपमुख्यमंत्री एकनाश शिंदे यांनी अंतिम आठवडा प्रस्तावावरच्या चर्चेला उत्तर दिलं. गोवंश बंदी कायद्याचा गैरफायदा घेणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल, असं पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी विधानसभेत स्पष्ट केलं.

**<><><><><>**

या अधिवेशनात जनतेच्या कल्याणासाठी कुठलाही निर्णय घेतला गेला नसून केवळ आगामी निवडणुका डोळ्यासमोर ठेवून अधिवेशन घेतल्याची टीका विरोधी पक्षाच्या नेत्यांनी नागपूरमधे वार्ताहर परिषदेत केली. कुपोषण, भ्रष्टाचार, अमली पदार्थाची विक्री याबद्दलच्या कुठल्याही प्रश्नाला सरकारनं उत्तर दिलं नाही, फक्त महानगरपालिका निवडणुकी डोळ्यासमोर ठेवून पुरवणी मागण्या मंजूर करून घेणं हाच अधिवेशनाचा हेतू होता, असा आरोप काँग्रेस विधिमंडळ पक्षाचे नेते विजय वडेट्टीवार यांनी केला. यातून विदर्भाच्या वाट्याला काहीही आलं नसून घाईगडबडीत अधिवेशन गुंडाळल्याची टीका त्यांनी केली.

**- - होल्ड - वडेट्टीवार - -**

विरोधी पक्षांनी अधिवेशन चालवण्यासाठी सरकारला संपूर्ण सहकार्य केलं, मात्र एकाही मंत्र्यानं अधिवेशन गांभीर्याने घेतलं नाही, अशी टीका शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते भास्कर जाधव यांनी केली.

**<><><><><>**

भारतीय जनता पार्टीच्या राष्ट्रीय कार्यकारी अध्यक्षपदी नितीन नबीन यांची नेमणूक झाली आहे. भाजपाच्या संसदीय मंडळाने ही नियुक्ती केल्याचं पक्षाचे राष्ट्रीय सरचिटणीस अरुण सिंग यांनी प्रसिद्ध केलेल्या पत्रकात म्हटलं आहे. नितीन नबीन सध्या बिहार मंत्रिमंडळात मंत्री असून ते जे पी नड्डा यांच्याकडून अध्यक्षपदाचा कार्यभार घेतील. नड्डा यांचा कार्यकाळ जानेवारी २०२० मधेच संपला होता मात्र २०२४ मधल्या लोकसभा निवडणुकीच्या दृष्टीनं त्यांना मुदतवाढ दिली होती.

नितीन नबिन हे मेहनती कार्यकर्ता असून त्यांना संघटनाचा समृद्ध अनुभव आहे असं सांगत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी त्यांचं अभिनंदन केलं आहे.

उत्तर प्रदेश भाजपाच्या अध्यक्षपदी केंद्रीय राज्य मंत्री पंकज चौधरी यांची नियुक्ती झाली आहे.

<><><><><>

आयआयटी बॉम्बे अर्थात भारतीय तंत्रज्ञान संस्था मुंबई इथं भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचं रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्या हस्ते आज लोकार्पण करण्यात आलं. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी संसदेत महिलांना ३३ टक्के आरक्षण देणारा कायदा मंजूर केला असून मोदींच्या नेतृत्वात केंद्र सरकारनं अनेक महत्वपूर्ण निर्णय घेतल्याचं रामदास आठवले यांनी यावेळी सांगितलं.

<><><><><>

१९ वर्षांखालच्या क्रिकेटमध्ये आशिया चषक स्पर्धेत आज दुबई इथं झालेल्या अ गटातल्या सामन्यात भारतानं पाकिस्तानला ९० धावांनी पराभूत केलं. पाकिस्ताननं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला. भारतानं ४६ षटकं आणि एका चेंडूत २४० धावा केल्या. एरॉन जॉर्जनं सर्वाधिक ८५ धावा केल्या. कनिष्क चव्हाणनं ४३, तर कर्णधार आयुष म्हात्रेनं ३८ धावांचं योगदान दिलं.

भारताच्या धावसंख्येचा पाठलाग करताना पाकिस्तानचा संघ ४१ षटकं आणि २ चेंडूत १५० धावात गारद झाला. भारतातर्फे दीपेश देवेंद्रन आणि कनिष्क चव्हाण यांनी प्रत्येकी ३ तर किशन सिंगनं २ गडी बाद केले.

<><><><><>

भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातल्या टी-ट्वेंटी क्रिकेट मालिकेतला तिसरा सामना आज धरमशाला इथं सुरु आहे.  भारतानं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा दक्षिण आफ्रिकेच्या पहिल्याच षटकात १ बाद १ धावा झाली होती.

पाच सामन्यांच्या या मालिकेत दोन्ही संघांनी प्रत्येकी एक सामना जिंकला आहे.

**<><><><><>**

राज्यातल्या १३ वर्षांखालच्या फुटबॉल खेळाडूंना जागतिक दर्जाचं प्रशिक्षण आणि शिष्यवृत्ती मिळण्यासाठी सुरू केलेल्या प्रोजेक्ट महादेव या योजनेचा प्रारंभ आज लोकप्रिय फूटबॉलपटू लिओनेल मेस्सी याच्या हस्ते झाला. मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस, क्रिकेटपटू सचिन तेंडुलकर, अभिनेता टायगर श्रॉफ, अजय देवगण यांच्यासह अन्य मान्यवर या सोहळ्याला उपस्थित आहेत. लिओनेल मेस्सीचा गोट इंडिया दौऱ्याचा कार्यक्रम आज मुंबईत सुरु आहे. मेस्सी आणि त्याचे सवंगडी आज मुंबईत आले आहेत. या पार्श्वभूमीवर दक्षिण मुंबईतल्या वानखेडे मैदानाच्या आसपास कडक पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे.

**<><><><><>**

ऊर्जेची बचत करणं हाच ऊर्जेचा सर्वात पर्यावरणस्नेही आणि विश्वसनीय स्रोत आहे, असं प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज राष्ट्रीय ऊर्जा संरक्षण दिनी केलं. या क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्यांना राष्ट्रीय ऊर्जा संरक्षण पुरस्कारानं राष्ट्रपतींनी आज नवी दिल्ली इथं झालेल्या कार्यक्रमात सन्मानित केलं, त्यावेळी त्या बोलत होत्या. जगातल्या सर्वाधिक वेगानं वाढणाऱ्या अर्थव्यवस्थांपैकी भारत एक असून विकासाच्या या यात्रेत ऊर्जेची गरजही वेगाने वाढत असल्याचं राष्ट्रपतींनी सांगितलं आणि ऊर्जा बचतीचं महत्त्व अधोरेखित केलं.

**<><><><><>**

खगोलप्रेमींना आज रात्री आकाशात उल्कावर्षावाचं अद्भुत दृष्य  पाहायला मिळणार आहे. हा या वर्षातला सर्वात मोठा उल्कावर्षाव असून, रात्री सुमारे ९ वाजल्यापासून पहाटेपर्यंत दर तासाला १०० हून अधिक उल्का पडताना दिसू शकतात. हा उल्कावर्षाव

मिथुन या तारकासमूहात होणार असल्यानं त्याला मिथुन उल्कावर्षाव असं नाव देण्यात आलं आहे.  शहरातल्या कृत्रिम उजेडापासून दूर, निरभ्र आकाशात वायव्य दिशेला हा उल्कावर्षाव साध्या डोळ्यांनी पाहता येईल.

**<><><><><>**

सोलापूर जिल्ह्यात साखर कारखान्यांनी उसाचे दर जाहीर करावेत या मागणीसाठी आज जिल्ह्यातल्या शेतकरी संघटनांनी २ साखर कारखान्यांचं गाळप काही काळ बंद पाडलं. ऊस दर जाहीर होईपर्यंत गाळप सुरू होऊ देणार नाही, असा इशारा त्यांनी दिला आहे.

**<><><><><>**

जालना इथं आयोजित वारकरी साहित्य संमेलनात आज टॉक शो हा चर्चेचा कार्यक्रम झाला. यात रिंगणचे संपादक सचिन परब, छायाचित्रकार संदेश भंडारे, नाट्यकलावंत ऋचिका खोत यांनी सहभाग घेतला. पंढरपूरची वारी ही अहंभाव विसरून समभाव निर्माण करणारी असून वारीतून जातमुक्तीचं अभियान राबवलं जातं असं मत सहभागी वक्त्यांनी यावेळी व्यक्त केलं.

**<><><><><>**

गेल्या २४ तासात विदर्भात बहुतांश ठिकाणी, मराठवाड्यात बऱ्याच ठिकाणी, तर कोकण आणि मध्य महाराष्ट्रात काही ठिकाणी किमान तापमानात किंचित घट झाली.

येत्या दोन दिवसात राज्यात सर्वत्र हवामान कोरडं राहील असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

**//<><><><><>//**